महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय

ठाणे शहर

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा,
यांचे कार्यालय ठाणे-४००६०१

Email ID: cp.thane.sbcommunal@mahapolice.gov.in दूरध्वनी क:२५३४२९२६

जा.क./विशा/सण - उत्सव/१६३ मनाई आदेश/३२६१/२०२६ दि :-११ /०९/२०२६

आदेश

ज्या अर्थी, दिनांक १५/०९, १६/०९, १८/०९, १९/०९, २०/०९/, २१/०९, २२/०९, तसेच २५/०९/२६ रोजी गणपती आणि गौरी मुर्तीचे पाण्यात विसर्जन होणार आहे. त्याचप्रमाणे दि.२६/०९/२०२६ रोजी १३ दिवसाचे व दि.०४/१०/२०२६ रोजी २१ दिवसाचे खाजगी गणपती मुर्तीचे विसर्जन होणार आहे.

ज्या अर्थी काही अर्ध्या विरघळलेल्या मुर्ती भरतीच्या वेळी किनाऱ्यावर वाहून जातात किंवा तलावाच्या पाण्यावर तरंगतात.

ज्या अर्थी, काही लोक तरंगणाऱ्या अशा मुर्तींचे फोटो घेतात तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी मुर्ती गोळा करतानाचे फोटो घेतात आणि धार्मिक भावना दुखावतील आणि सार्वजनिक शांतता आणि भावना भंग पावतील अशी छायाचित्रे प्रकाशित/प्रसारित करतात.

ज्या अर्थी उपरोक्त परिस्थीतीत माझे मत आहे की, विसर्जनानंतर अशी छायाचित्रे काढणे, प्रकाशित करणे आणि प्रसारित करणे प्रतिबंधित करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. अणि कलम १६३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अन्वये त्वरीत प्रतिबंधासाठी जलद उपाय करणे इष्ट असलेने ते त्वरीत प्रतिबंधित करण्यासाठी माझे कडे पुरेसे कारण आहे.

त्या अर्थी मी, पराग मणेरे पोलीस उप आयुक्त आर्थिक गुन्हे शाखा, अतिरीक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त विशेष शाखा, ठाणे शहर, तथा कार्यकारी दंडाधिकारी, कलम १६३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये देण्यात आलेल्या विशेष अधिकाराव्वये याव्द्रारे आदेश देतो की, कोणत्याही व्यक्तीने गणपती विर्सजनानंतर तरंगत्या मुर्तीचे किंवा अर्धवट तरंगत्या मुर्तीचे फोटो काढू नयेत आणि ते प्रकाशीत किंवा प्रसारित करू नये.

हा आदेश १५ सप्टेंबर २०२६ ते ४ आक्टोंबर २०२६ पर्यंत ठाणे आयुक्तालयात लागु राहील.

या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणत्याही व्यक्ती भारतीय न्याय संहिता,२०२३ च्या कलम २२३ अंतर्गत दंडनीय असेल.

मी पुढे असे निर्देश देतो की, हा आदेश सार्वजनिक ठिकाणी त्याच्या प्रती चिटकवून, स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन आणि ठाणे आयुक्तालयात लाऊड स्पीकरव्दारे त्याची घोषणा करून प्रसिध्द केला जाईल.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक११ /०९/२०२६ रोजी दिला आहे.

पोलीस उप आयुक्त विशेष शाखा, ठाणे शहर सत्यमेव जयते

पोलीस आयुक्त,ठाणे
यांचे कार्यालय ठाणे शहर.

(पराग मणेरे)
पोलीस उप आयुक्त,आ.ग,शा.ठाणे
अति. कार्यभार,पोलीस उप आयुक्त,वि.शा.ठाणे.

प्रति,
१) सर्व संबधितांना,
२) समन्वय अधिकारी ए.एस (पोलीस पत्रकात प्रसिध्दीकरीता)

11/9/2026
आपक मदतनीस सहायक
जेल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

PC 251 11/9/26

दिनांक 9910912026
जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे 4:40 PM

Scanned with CamScanner